सरला भावसार

# परिचारिका

## आरोग्यसेवेचा कणा



# परिचारिका: आरोग्यसेवेचा कणा

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखिकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# परिचारिका: आरोग्यसेवेचा कणा

“(Nurses : The Backbone of Healthcare)”


## लेखिका : सौ. सरला राजेन्द्र भावसार

राष्ट्रीय फ्लॉरेन्स नाइटिंगेल पुरस्कार-२००८ प्राप्त, सेवानिवृत्त अधिसेविका, मनोरुग्णालय, येरवडा, पुणे, सार्वजनिक आरोग्य सेवा, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य.

लेखन संपादक : डॉ. सुजाता मोरे चव्हाण



प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

# परिचारिका: आरोग्यसेवेचा कणा

## लेखिका सौ. सरला राजेन्द्र भावसार

राष्ट्रीय फ्लॉरेन्स नाइटिंगेल पुरस्कार-२००८ प्राप्त, सेवानिवृत्त अधिसेविका, मनोरुग्णालय, येरवडा, पुणे, सार्वजनिक आरोग्य सेवा, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य.

फोन क्रं.- ९०२८०१५२३७

ई-मेल - sarala.bhavsar@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १२ मे २०२० (World Nursing Day)

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे

# -: प्रास्ताविक :-

परिचारिका ह्या आरोग्यसेवांचा महत्वाचा घटक आहे. दिनांक १२ मे हा जागतिक परिचारिकादिवस म्हणून साजरा केला जातो. १२ मे हा फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांचा जन्मदिवस. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस जागतिक परिचारिका दिन म्हणून साजरा केला जातो. फ्लोरेन्स नाईटिंगेल यांना आधुनिक परिचर्याची जनक म्हणतात.

जागतिक आरोग्य संघटनेने फ्लोरेन्स नाईटिंगेल यांच्या द्विशतकी (२०० वा) वर्धापन दिनानिमित्त २०२० हे वर्ष नर्स मीड वाइफ चे वर्ष जाहीर केले आहे.

ह्या वर्षी, जागतिक परिचरिका दिवसाचे घोषवाक्य ( theme) आहे,

**“Nursing the World to Health”**

“focusing on the true value of nurses to the people of the world” .

आरोग्य विषयक आव्हानांच्या विस्तृत श्रेणीचे निराकरण करण्यासाठी परिचारिका कशी महत्त्वाची आहे हे सदर घोषवाक्य दर्शवते.

परिचर्या क्षेत्र आरोग्याचे नेतृत्व करू शकते. परिचर्या क्षेत्राची व्यापकता सर्व सामान्यांना करुन देण्याच्या हेतूने हें लिखाण.

**१२ मे ह्या परिचारिका दिवसाच्या तुम्हां सर्वांना सदिच्छा !**

**या सेवेला व याचा पाया घालणाऱ्या फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांना कोटी कोटी प्रणाम !**

सौ. सरला राजेन्द्र भावसार                डॉ. सुजाता मोरे चव्हाण

**१२ मे २०२०**



**फ्लॉरेन्स नाइटिंगेल ह्यांना सविनय अर्पण !**

# फ्लॉरेन्स नाइटिंगेल

आजारी सैनिकांची सेवा करणारी जगातली पहिली नर्स म्हणजे फ्लॉरेन्स नाइटिंगेल होय. १२ मे फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांचा जन्म दिवस. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ जागतिक परिचारिका दिन म्हणून मानला जातो. फ्लोरेन्स नाईटिंगेल यांना आधुनिक परिचर्याची जनक म्हणतात.

परिचर्या सेवा ही शास्त्रीय पद्धतीवर आधारित अशी एक कला आहे. परिचारिका ही आरोग्याची रक्षक, शिक्षक, मार्गदर्शक व आशेची खुण आहे. सर्वांना आरोग्य पुरविण्यासाठी शासनाने खेडोपाडी परिचारिकांची नियुक्ती करून आरोग्यसेवा उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

एकोणिसाव्या शतकापर्यंत परिचर्या मध्ये विशेष प्रगती नव्हती. फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांचा जन्म १२ मे १८२० रोजी इटली तील अत्यंत श्रीमंत इंग्लिश घराण्यात झाला. फ्लॉरेन्स नाइटिंगेल ह्या अतिशय बुद्धिमान होत्या. त्यांना लॅटिन ग्रीक इत्यादी अनेक भाषा अवगत होत्या. त्यांना समाजकार्याची खूप आवड होती. परमेश्वराने आपल्याला विशिष्ट काम करण्यासाठी पाठविले आहे असे वाटून त्यांनी

परिचर्या करण्याचे ठरविले. रुग्ण सेवा करणे त्याकाळी कमीपणाचे मानले जात असे म्हणून घरातून त्यांच्या या निर्णयाला विरोध झाला. पण त्यांनी कौटुंबिक-सामाजिक विरोध पत्करून रुग्ण सेवेला आपला आयुष्य वाहून घेतले. सन १८४७ मध्ये युरोपमध्ये भेट देऊन रोम मध्ये दहा दिवसाचे नर्सिंगचे प्रशिक्षण घेतले . त्यानंतर सन १८५० मध्ये ग्रीस भेटीत अनेक मिशनरींना भेटी देऊन तेथील अनाथाश्रम दवाखाने, अनेक संस्थे तील परिचर्येचा अभ्यास केला व आपल्या निरीक्षणातून त्यांना असे आढळले की परिचारिकांना पद्धतशीरपणे शास्त्रोक्त पद्धतीने परिचर्याचे प्रशिक्षण देण्याची गरज आहे. इसवीसन १८५४-१८५६ च्या काळात रशिया व तुर्कस्थान क्रिमियन युद्धात फ्रान्स व इंग्लंड तुर्कांना मदत करीत होते. जखमी सैनिकांची देखभाल व सुश्रुषा करण्यास फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांना शासनाने पाचारण केले. अवघ्या ३८ परिचारिकांच्या ताफ्यासह त्या युद्ध क्षेत्रावर हजर झाल्या. त्या ठिकाणी जवळपास पंधराशे रुग्ण होते. दवाखान्यातील वॉर्ड्स (कक्ष) अतिशय अस्वच्छ, दुर्गंधीयुक्त होते. हवा - प्रकाश यांचा अभाव होता. पाण्याची कमतरता, शौचालय यांची सोय नव्हती. अशा ठिकाणी जखमी सैनिक जमिनीवरच महिनोंमहिने पडलेले होते. गणवेष रक्ताने भरलेले - घाणीने माखलेले होते. त्याशिवाय काम करण्यासाठी साधनसामुग्री उपलब्ध नव्हती. अन्न देखील चांगले शिजवलेले नसे. परिणामतः त्या ठिकाणी कॉलरा व इतर संसर्गजन्य रोगांची लागण झाली होती. बरेच सैनिकांचा रोगामुळे मृत्यू झाला. या सैनिकांची जबाबदारी फ्लॉरेन्स यांनी घेतली. अपुऱ्या सुविधा व साधन सामग्री असुनही त्यांनी आपले कौशल्य पणास लावले. सर्वात अगोदर सर्व वॉर्ड स्वच्छ केले. रुग्णांना स्वच्छ केले.

त्यांना स्वच्छ कपडे व चादर दिल्या. रुग्णांसाठी स्वतंत्र स्वयंपाक गृहाची व्यवस्था करून त्यांच्या आजारानुसार जेवण देण्याची व्यवस्था केली.

दोन महिन्यात परिस्थिती सुधारली. जखमी सैनिकांची उत्तम परिचर्या करून मृत्यूचे प्रमाण ४२% वरून २% वर आणले.

सैनिकासाठी त्यांनी वाचनालय आणि पोस्ट ऑफिस सुरू केले.

संपूर्ण दिवसभर त्या काम करीत व संध्याकाळच्या वेळी सैनिकांच्या घरी पत्र पाठवण्याचे काम त्या करीत. दिवसभराच्या कामा मुळे सैनिकांना भेटण्यास वेळ मिळत नसे . त्यामुळे रात्रीच्या वेळेस हातात दिवा घेऊन त्या प्रत्येक सैनिकाची विचारपूस करीत .

त्यांच्या कार्यामुळे प्रभावित होऊन सैनिक त्यांना आदराने **"लेडी विथ द लॅम्प"** "प्रकाश देवी" म्हणून संबोधिले गेले. सैनिकांची सेवा सुश्रुषा करतांना केलेल्या निरीक्षणावरून, अनुभवावरून त्यांनी एक पुस्तक लिहिले. त्यात सैनिकी व सामान्य रुग्णालयासाठी वैद्यकीय उपचार व सुश्रुषेवर मुद्देसूद माहिती व शिफारशी सुचविलेल्या आहेत. नर्सिंग चा दर्जा उंचावण्यासाठी "नोट्स ऑन नर्सिंग" , हे पुस्तक प्रसिद्ध करण्यात आले. यामुळे परिचर्या प्रशिक्षणात सुधारणा झाली.

इसवीसन १८६० मध्ये त्यांनी लंडन मधील सेंट थॉमस हॉस्पिटलमध्ये "नाइटिंगेल स्कूल ऑफ नर्सिंग" सुरू केले. ही स्त्रियांना नर्सिंगचे शिक्षण देणारी

जगातील पहिली संस्था होय. परिचर्या क्षेत्रातील त्यांनी ठरवून दिलेली तत्वे आजही पाळण्यात येतात. ती पुढिल प्रमाणे:

- परिचारिका प्रशिक्षण हे दवाखान्यातच दिले गेले पाहिजे.
- परिचर्या प्रशिक्षणाची प्रमुख परिचारिका असली पाहिजे.
- प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थी परिचारिका यांनी शिस्त व नैतिक चारित्र्य शिकण्यासाठी वसतीगृहातच राहिले पाहिजे.
- शिक्षण देत असताना पुस्तकी ज्ञान व प्रात्यक्षिक शिक्षण यांचा परस्पर संबंध साधला जावा.
- प्रशिक्षण संस्था ही आर्थिक बाबतीत स्वयंपूर्ण व स्वतंत्र असावी.

इंग्लंड मधील सर्व हॉस्पिटलच्या त्या नर्सिंग सल्लागार झाल्या. १९०७ साली किंग एडवर्ड यांच्यातर्फे **“ऑर्डर ऑफ मेरीट”** ही पदवी देऊन सन्मान करण्यात आला. ही पदवी मिळविणाऱ्या फ्लॉरेन्स नाइटिंगेल ह्या पहिल्या स्त्री होत्या. परिचर्या व्यवसायाचा पाया घालण्याचे काम फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांनी केले. परिचर्या हे क्षेत्र नोबेल प्रोफेशन म्हणून ओळखले जाते. १३ ऑगस्ट १९१० च्या रात्री झोपेत या अमर व्यक्तीची प्राणज्योत मालवली.

फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांनी परिचारिकांना आदर्श दिला. त्याचे प्रत्यक्ष स्वरूप आपण परिचर्या सेवेत आज बघत आहोत.

फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांचा १२ मे २०२० हा २०० वा वर्धापन दिन आहे. दरवर्षी जागतिक परिचारिका संघटना परिचारिका दिनानिमित्त एक थीम ब्रीद वाक्य जाहीर करते व त्या अनुषंगाने वर्षभर कार्य चालते.

Theme for International Nurses Day, 2020 is -

**“Nursing the World to Health -** focusing on the true value of nurses to the people of the world”.

आरोग्यविषयक आव्हानांच्या विस्तृत श्रेणीचे निराकरण करण्यासाठी परिचारिका कशी महत्त्वाची आहे हे दर्शवते.

जागतिक आरोग्य संघटनेने (वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन ) फ्लोरेन्स नाईटिंगेल यांच्या द्विशतकी वर्धापन दिनानिमित्त २०२० हे वर्ष **नर्स मीड वाइफ** चे वर्ष जाहीर केले आहे. परिचर्या क्षेत्र जागतिक आरोग्याचे नेतृत्व करू शकते. परिचर्या हा समाजाचा केंद्रबिंदू आहे. जगातील लोकांना नर्स च्या खऱ्या मूल्यांवर लक्ष केंद्रित करते.

# परिचर्या एक शास्त्र

परिचर्या ही एक शास्त्रावर आधारित अशी कला आहे. परिचर्या म्हणजे असहाय्य व्यक्तीचे रुग्णाचे संगोपन व संवर्धन करणे. व्यक्तीचा वेदना जाणून वेदनांपासून मुक्तता करणारी इतर सांसर्गिक आजारापासून संरक्षण करणारी, हसत मुखाने मदत करणारी आपला आदर्श ठेवून जी व्यक्ति वागते तिला परिचारिका म्हणतात. विशेषतः परिचर्या क्षेत्रात अधिक स्त्रियाच असतात. घरी देखील आजारी व्यक्तीचे देखभाल घरातील स्त्री करते कारण स्त्रीचा स्वभाव प्रेमळ असतो. त्याग, ममता, मातृत्व, वात्सल्य, विनम्रता, सहनशीलता हे गुण स्त्रीच्या अंगी लहानपणापासुन उपजत असतात. दुसऱ्यांच्या सुखदुःखात ती सहभागी होते.

# परिचर्या इतिहास

प्राचीन भारतात वैद्यकीय सेवा फक्त वैद्य डॉक्टर देत असत. वैद्यक शास्त्राचे जनक सुश्रृता यांनी सुश्रुषा करणाऱ्या व्यक्तीच्या अंगी कोणते गुण असावे हे नमूद केलेले आहे. प्राचीन युगात सतराव्या शतकापर्यंत औपचारिक नर्सिंग होते. प्रत्येक गावात माता व बालकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी एक दाई असायची. ब्रिटिश भारतात आल्या नंतरच भारतात नर्सिंगला सुरुवात झाली. स्वातंत्र्य पूर्व काळात इंग्रजांची राजवट होती त्याकाळी रिलीजियससिस्टर कडून त्यांच्या लष्करी सैनिकांना व कुटुंबाला नर्सिंग सर्विसेस देत.

सतराव्या शतकात प्राचीन नर्सिंग सैनिकी नर्सिंग सुरु झाले. इसवीसन १६६४ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने फोर्ट सेंट जॉर्ज मद्रास येथे सैनिकांसाठी रुग्णालय सुरू केले गेले. सन १७९७ मध्ये गरिबांसाठी मद्रास मध्ये एक प्रसूती रुग्णालय बांधले गेले. सन १७०८ कलकत्ता मध्ये पहिले कलकत्ता मेडिकल कॉलेज हॉस्पिटल सुरू झाले. सन १८३८ मध्ये नेयुर मधील लंडन मिशन हॉस्पिटल, त्या नंतर सन १८४३ मध्ये सर जे. जे. रुग्णालय मुंबई, सन १८५३ मध्ये आग्रा येथे थामसन हॉस्पिटल, सन १८५५ मध्ये होली फॅमिली हॉस्पिटल दिल्ली, सन १८६० मध्ये सिविल हॉस्पिटल अमृतसर, सन १८८१ मध्ये सीएमसी लुधियाना - पंजाब, सन १८९२ मध्ये

मिरज मेडिकल स्कूल अँड हॉस्पिटल महाराष्ट्र अशी विविध रुग्णालये स्वातंत्र्यपूर्व काळात सुरू झाली.

फ्लॉरेन्स नाइटिंगेल पहिली महिला होती जिचा भारतीय नर्सिंग शिक्षण व पद्धती ह्यावर मोठा प्रभाव पडला. त्यांनी मिलिटरी व जनरल रुग्णालयात परिचर्या क्षेत्रात सुधारणा घडवून आणल्या.

सेंट स्टिव्हन हॉस्पिटल येथे भारतीय महिलांना नर्सिंगचे प्रशिक्षण देणारी पहिली संस्था सन १८६७ मध्ये दिल्लीत सुरु झाली.

सन १८७१ मध्ये मद्रास येथील गव्हर्मेंट जनरल हॉस्पिटल मध्ये मिड वाइफ हे पहिले सहा महिन्याचे प्रशिक्षण सत्र चार विद्यार्थ्यांसहसुरू झाले. यासाठी इंग्लंडमधून चार लेडीज सुपरिटेंडेंट आणि चार ट्रेन नर्सेस नियुक्त केले होते.

त्या नंतर सन १८९० ते १९०० हया दशकात भारतात बरेच मिशनरी व गव्हर्नमेंट हॉस्पिटल मध्ये नर्सिंगचे शिक्षण सुरू झाले. यावेळी सर्वत्र एकसारखे शैक्षणिक मानकनव्हते.

सन १९०७ ते १९१० मध्ये उत्तर भारतात मिशन रुग्णालयांसाठी युनायटेड परीक्षक मंडळ स्थापन केले गेले, ज्यांनी नर्सिंग शिक्षण मापदंड व नियम तयार केले. नंतर सन १९१३ मध्ये दक्षिण भारत सी. एम. ए आय. चे बोर्ड स्थापन झाले आणी त्यांनी नर्सिंगची परीक्षा घेतली व पदविका प्रदान केली. नंतर सन १९२६ मध्ये मध्य भारतात नर्सिंग बोर्डाची स्थापना झाली.

सन १९१८ मध्ये लेडी रिडींग हेल्थ स्कूल दिल्ली येथे हेल्थ विजिटर चा कोर्स सुरू झाला. सन १९४६ मध्ये पहिले चार वर्षाचे बेसिक बी. एस .सी. नर्सिंग पदवी अभ्यासक्रम दिल्लीतील आर .ए .के. कॉलेज ऑफ नर्सिंग आणि वेल्लोर मधील सी. एम. सी .कॉलेज ऑफ नर्सिंग येथे सुरू झाला.

सन १९६० मध्ये एम. एस. सी .नर्सिंगचा पदव्युत्तर अभ्यासक्रम दिल्लीतील आर. के. कॉलेज ऑफ नर्सिंग मध्ये सुरू झाला.

सन १९५१ मध्ये पंजाब मधील सेंट मेरी हॉस्पिटलमध्ये दोन वर्षाचा नर्स मिड वाइफ हा अभ्यासक्रम सुरू झाला.

सन १८९० मध्ये बॉम्बे प्रेसिडेन्सी नर्सिंग असोसिएशन ही पहिली राज्य असोसिएशन निर्माण झाली.

सन १९०८ मध्ये ट्रेन्ड नर्सेस असोसिएशन ऑफ इंडिया स्थापना झाली. या असोसिएशनच्या माध्यमातून परिचर्या क्षेत्रातील शैक्षणिक व व्यवसायिक बाबतीत काम केले जाते.

सन १९२६ मध्ये मद्रास नर्सिंग कौन्सिल हे पहिले राज्य नोंदणी परिषद स्थापन झाले.

सन १९४७ मध्ये भारतीय स्वातंत्र्या नंतर सामाजिक विकास कार्यक्रम आणि रुग्णालय सेवेच्या विस्तारामुळे परिचारिका सहाय्यक परिचारिका, नर्सिंग ट्यूटर, आणि नर्सिंग प्रशासकीय यांची मोठी मागणी निर्माण झाली.

नर्सिंग प्रशिक्षणाची गुणवत्ता आणि सुसूत्रता आणण्यासाठी १९४७ साली इंडियन नर्सिंग कौन्सिलचा कायदा झाला. सन १९४९ मध्ये इंडियन नर्सिंग कौन्सिल / भारतीय परिचर्या परिषद स्थापना झाली.

त्यानंतर बऱ्याच राज्यात स्टेट नर्सिंग कौन्सिल ची स्थापना झाली. स्टेट नर्सिंग कौन्सिल अंतर्गत मुख्यत्वे नर्सिंग शिक्षणाच्या परीक्षा घेणे, सेवा नोंदणी करणे व आरोग्य सेवा देण्यासाठी परवानगी देणे इत्यादी बाबी बघितल्या जातात.

महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल / महाराष्ट्र परिचर्या परिषद ही भारतातील २६ वी परिषद आहे. महाराष्ट्र परिचारिका कायदा सन १९६६ मध्ये वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग मंत्रालय मुंबई यांच्या अधिपत्याखाली स्थापित झालेली आहे.

स्वातंत्र्याच्या वेळी नर्सिंग क्षेत्राची परिस्थिती तेवढी चांगली नव्हती. नर्सिंग बाबत देशात सामाजिक दर्जाचा अभाव होता. नर्सिंगच्या प्रशिक्षणाने व आधुनिक गरजा प्रमाणे ह्या क्षेत्रामध्ये अमुलाग्र बदल होत गेले व सर्व स्तरातून ह्या क्षेत्रात येणाऱ्यांची संख्या वाढत गेली.

सन १९५६ मध्ये एंड्रेनवाला ह्यांना भारत सरकारचे पहिले नर्सिंग सल्लागार म्हणून नियुक्त केले गेले.

पंचवार्षिक योजना सह वेगवेगळ्या समित्या स्थापन केल्या गेल्या. सन १९४३ मध्ये भोरे समिती, सन १९५४ मध्ये शेट्टी समिती, सन १९५९ ते सन १९६१ मुदलियार समिती, सन १९७३ मध्ये करतार सिंग समिती, सन १९७४ मध्ये श्रीवास्तव समिती, सन १९८७ मध्ये हाय पावर कमिटी - अशा विविध समित्यांच्या शिफारशीनुसार नर्सिंग क्षेत्रात अमुलाग्र बदल घडवून आणले

गेले आहेत. त्यांनी काही पुढिल संदर्भातील शिफारशी केल्या आहेत . रुग्णालयातील परिचर्या सेवा, परिचर्या प्रशिक्षण केंद्र, राहण्याची व्यवस्था, पायाभूत सुविधा, उपकरणे, कामाबद्दलचे नियम, कर्मचाऱ्यांची कमतरता भागवण्यासाठी प्रशिक्षण, परिचारिकांचे कौशल्य स्तर वृद्धिंगत करण्यावर भर तसेच नर्सिंगमध्ये सुपर स्पेशलिटी अभ्यासक्रम स्थापन करण्याची गरज .ह्या काही शिफारस आहेत.

स्वातंत्र्या नंतर आरोग्य सेवांचे पुनर्गठन झाले. ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्रांची उपकेंद्रांची स्थापना झाली व शिफारसीनुसार नर्सिंगची पदे भरण्यात आली. सन १९७७ पासून आजतागायत बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी योजनेची सुरुवात झाली. ३००० ते ५००० लोकसंख्येला एक उपकेंद्र असावे. या क्षेत्रातील कुटुंबांना आरोग्य सेवा पुरविण्यासाठी सन १९९६ मध्ये आरसीएच कार्यक्रमांतर्गत दोन आरोग्य सेविका, महिला व बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी, एम पी डब्ल्यू पुरुष, यांची नियुक्ती करण्यात आली.

'आशा'  या स्थानिक समाजातील स्वयंस्फूर्तीने काम करणाऱ्या मदतनिसांची निर्मिती केली. "सर्वांना आरोग्य", या संकल्पने साठी भारतात चांगली सुरुवात झाली.

आधुनिक परिचर्याचे स्वरूप हे भूत काळा पेक्षा भिन्न आहे. सध्याची मानव जिवन शैली, राहणीमान, बदलणारे वातावरण, संस्कृती विविधता, वाढती लोकसंख्या, शहरीकरण, यामुळे आज आरोग्याबाबतची अनेक आव्हाने उद्भवली आहेत. परिचारिकांच्या भूमिका विकसित होत आहेत. सध्या आरोग्य क्षेत्रात स्पेशालिटी, सुपर स्पेशालिटी, आधुनिक तंत्रज्ञान, वैज्ञानिक प्रगती चे युग आहे. परिचारिका आरोग्य मूल्यांकन करू शकतात. नवीन नर्सिंगच्या समर्थनासाठी पुरावे शोधण्यासाठी संशोधन करू शकतात. स्थानिक राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर नर्सिंगशी संबंधित धोरणांवर प्रभावीपणे सहभागी होऊ शकतात व प्रभाव पाडू शकतात.

## परिचर्या शिक्षण व परिचर्या क्षेत्राची व्याप्ती

परिचर्या प्रशिक्षणामध्ये विविध कोर्सेस व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम आहेत. ए एन एम - ऑक्सिलरी नर्स मिड वाइफ हा दोन वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम असतो. हे प्रशिक्षण घेतलेली परिचारिका ग्रामीण भागात तसेच माता बाल संगोपन रुग्णालय याठिकाणी सेवा देऊ शकते.

जी. एन. एम. - जनरल नर्सिंग मीड वाइफ हा आधी साडेतीन वर्षाचा कोर्स होता. सन २०१५ मध्ये त्यात सुधारणा होऊन तो तीन वर्षांचा करण्यात आला. हे प्रशिक्षण घेतलेली व्यक्ती ग्रामीण भागात तसेच शहरी भागात आरोग्यसेवा देऊ शकते. जीएनएम कोर्स केल्यानंतर पोस्ट बेसिक बी. एस .सी. नर्सिंग दोन वर्ष कालावधीचा कोर्स करता येतो. हा कोर्स केल्यानंतर नर्सिंग ट्यूटर म्हणून परिचारिका प्रशिक्षण देता येते. बी. एस. सी .नर्सिंग हा पदवी अभ्यासक्रम सुरू झालेला आहे.

एम. एस. सी. नर्सिंग, एम .फिल, पी .एच. डी. यासारखे पदव्युत्तर अभ्यासक्रम विद्यापीठांमार्फत घेतले जातात.

ग्रामीण भागात व दुर्गम भागात उपकेंद्र आरोग्य सेवा देण्यासाठी उपकेंद्राची स्थापना केलेली आहे. ते अशा ठिकाणी आरोग्य सेवा देण्यासाठी आरोग्य सेविका

व आरोग्य सेवक पुरुष मल्टीपर्पज हेल्थ वर्कर यांची नियुक्ती केली जाते. यासाठी दीड वर्ष कालावधीचे प्रशिक्षण असते.

ग्रामीण भागातील तसेच शहरी भागातील सार्वजनिक आरोग्याचे पर्यवेक्षण यासाठी सार्वजनिक आरोग्य परिचारिका नियुक्ती केली जाते. जनरल नर्सिंग कोर्स केल्यानंतर अकरा महिने कालावधीचा सार्वजनिक आरोग्य प्रशिक्षणाचा हा कोर्स करता येतो महाराष्ट्रात नागपुर येथे प्रशिक्षण संस्था आहे.

जनरल नर्सिंग कोर्स नंतर बालरुग्ण परिचार्य अकरा महिने कालावधीचा कोर्स करता येतो. मुंबईला सर जे .जे. रुग्णालय येथे प्रशिक्षण घेता येते.

मनोरुग्ण परिचर्या हा अकरा महिने कालावधीचा कोर्स पूर्वी बेंगलोर येथे करता येत होता , तो आता पुणे येथे ससून रुग्णालयात सुरू करण्यात आला आहे.

परिचर्येतील विविध क्षेत्रातील कौशल्य वृद्धिंगत करण्यासाठी उदाहरणार्थ ऑपरेशन थेटर टेक्निक, आर्थोपेडिक नर्सिंग, कमी कालावधीचे कोर्स करता येतात.

महाराष्ट्रामध्ये सर्व जिल्हास्तरावर ए एन एम, जी एन एम, नर्सिंग कोर्स खाजगी व शासकीय रुग्णालयात घेतले जातात.

परिचर्या प्रशिक्षणाची परीक्षा महाराष्ट्र परिचर्या परिषद मुंबई यांचे मार्फत घेतली जाते. प्रशिक्षणार्थी पास झाल्यानंतर रजिस्ट्रेशन केले जाते व सेवा करण्यासाठी परवानगी दिली जाते. दर पाच वर्षांनी नोंदणीचे नूतनीकरण करावे लागते.

रुग्णालय सेवा प्रदान करतांना स्टाफ नर्स म्हणून नियुक्ती केली जाते. परिचर्या अनुभव शैक्षणिक पात्रतेनुसार परी सेविका पदावर पदोन्नती होते.

शैक्षणिक गुणवत्तेनुसार व अनुभवा नुसार सहाय्यक अधिसेविका, अधिसेविका या पदावर पदोन्नती होते. पदोन्नती नुसार कार्यक्षेत्राच्या जबाबदाऱ्या वाढतात.

राज्यपातळीवर नर्सिंग विभागात विविध पदे असतात. वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाकडे नर्सिंग सुपरिटेंडेंट हे नर्सिंगचे वरिष्ठ पद आहे, सार्वजनिक आरोग्य विभागाकडे असिस्टंट डायरेक्टर पब्लिक हेल्थ हे वरिष्ठ पद आहे. राष्ट्रीय स्तरावर नर्सिंग ॲडव्हायझर हे वरिष्ठ पद आहे.

उत्कृष्ट काम करणाऱ्या परिचारिकांना वेगवेगळ्या स्तरावर पारितोषिके देण्यात येतात. आगाऊ वेतन वाढ देण्यात येते. **नॅशनल फ्लॉरेन्स नाइटिंगेल अवॉर्ड**, हे सर्वोच्य पारितोषिक सन १९७३ मध्ये केंद्र सरकार मार्फत परिचर्या क्षेत्रात अविरत उत्कृष्ट आरोग्य सेवा देणाऱ्या परिचारिकांसाठी सुरु करण्यात आला. त्याला **"राष्ट्रीय फ्लॉरेन्स नाइटिंगेल पुरस्कार" "NATIONAL FLORENCE NIGHTINGALE AWARD"** असे संबोधण्यात येते.

या अवॉर्ड साठी प्रत्येक राज्यातून एक ANM - ऑक्झिलरी नर्स मिड वाइफ, एक LHV - लेडी हेल्थ व्हिजिटर, एक GNM - जनरल नर्सिंग अँड मिड वाइफ कॅटॅगरी मधिल नर्स ची निवड केली जाते.

हे पारितोषिक दर वर्षी जागतिक परिचारिका दिना निमित्त राष्ट्रपतीभवन नवी दिल्ली येथे कार्यक्रम आयोजित करून सर्व निवड झालेल्या परिचारिकांना महामहिम राष्ट्रपती यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात येते.

संपूर्ण भारतात परिचर्या क्षेत्रात याप्रमाणे दिवसेंदिवस प्रगती होत आहे. आरोग्याच्या गरजा बदलत आहेत त्याप्रमाणे आरोग्य सेवेत परिचर्या क्षेत्रात अमुलाग्र बदल होत आहेत.

नर्सिंग क्षेत्रात पुरुषांचा प्रवेश झालेला आपण पाहतो. हा बदल खूपच चांगला आहे. काही परिचर्या क्षेत्रात पुरुषाचे असणे खुप उपयोगी ठरते, उदाहरणार्थ फिरते आरोग्य पथक, मनोरुग्णाची परिचर्या, दुर्गम भागात आरोग्य सेवा.

परिचारिका या आरोग्य यंत्रणेचा कणा आहे. सामाजिक आरोग्य हे परिचारिकां शिवाय पूर्ण होऊ शकत नाही. कारण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत समाजातील सर्वात लहान घटक हा कुटुंब. या कुटुंबाच्या सर्वात जवळ कोण असेल तर ती परिचारिका होय. कुटुंबातल्या सोनुल्याचा पहिला श्वासाला आधार तो परिचारिकेचाच. रुग्णालयात अनेक प्रकारचे रुग्ण येतात. या रुग्णांची देखभाल, शुश्रुषा चांगली झाली तरच रुग्ण बरा होऊ शकतो. परिचारिका ही २४ तास रुग्णाच्या सानिध्यात असते. रुग्णाचे हीत-अहित तिला चांगले माहीत असते. तिचा अचूक निर्णय, चपळाई, रुग्णाचा जीव वाचवू शकतो. एका रुग्णाचा आजार दुसऱ्या रुग्णाला होऊ नये, इतरांना होऊ नये म्हणून काळजी घेणारी, उपचार करणारी, शुश्रुषा करणारी, महत्त्वाची व्यक्ती म्हणजे परिचारिका - नर्स. ज्या रुग्णांची देखभाल नातेवाईक सुद्धा करीत नाही अशा गंभीर रुग्णांची देखभाल, शुश्रुषा परिचारिका करते. रुग्णाला औषध देणे, इंजेक्शन देणे, मलमपट्टी करणे, गंभीर रुग्णाची शारीरिक स्वच्छता, रूग्णाला भरवणे, रुग्णाला आरामदायी ठेवणे, योग्य सल्ला, मार्गदर्शन, समुपदेशन, रुग्ण कक्षाचे व्यवस्थापन व आवश्यक नोंदी ठेवणे अशी बरीच कामे ती करत असते. आपत्कालीन समयी तत्पर सेवा देण्यास दिवस-रात्र हजर असते.

आरोग्य सेवेचा कणा मानली जाणारी ही परिचारिका प्राथमिक आरोग्य सेवा किंवा रुग्णालय आरोग्य सेवा देताना तिच्या गुणात्मक बाबींचा विचार केला जातो.

वेळोवेळी उद्भवणाऱ्या आरोग्य समस्ये नुसार तिचे ज्ञान व कौशल्य अद्ययावत केले जाते. केंद्र सरकार, राज्य सरकार यांचे मार्फत आरोग्य कार्यक्रम राबवले जातात. या सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाची धुरा सांभाळली जाते ती परिचारिके मार्फत. परिचर्यासेवेची व्याप्ती फार वाढलेली आहे. हे परिचर्येच्या वेगवेगळ्या क्षेत्रात विशेष अभ्यासक्रम आहेत बी .एस .सी .नर्सिंग, एमएससी नर्सिंग, एम फील, पी एच डी, यासारखे परिचर्येतील पदव्युत्तर शिक्षण घेऊन बऱ्याच परिचारिका उच्च पदावर कार्यरत आहेत. जनरल नर्सिंग कोर्स नंतर बाल रुग्ण परिचर्या, मनो रुग्ण परिचर्या, सार्वजनिक आरोग्य परिचर्या, ऑपरेशन थिएटर  टेकनिक, आर्थोपेडिक यासारखे अनेकाविध शाखेचे स्पेशल नर्सिंग कोर्स करता येतात व त्या क्षेत्रात परिचारिकेला अधिक प्रभावीपणे परिचर्या करता येते. संशोधन क्षेत्रात सुध्धा परिचारिका अग्रेसर आहे.

परिचारिका साठी राज्य परिचारिका परिषद, राष्ट्रीय परिचारिका परिषद व संघटना तसेच जागतिक परिचारिका संघटना कार्य करतात. त्यांच्या माध्यमातून अनेक आरोग्य कार्यक्रम घेतले जातात. ह्या संघटना परिचारिकांच्या समस्या सोडवतात, मार्गदर्शन करतात, शैक्षणिक प्रगतीत मदत करतात, संशोधन करतात.

सध्या जगात covid-19 चे महाभयंकर महामारीचे आरोग्य संकट आलेले आहे. संपूर्ण जग त्यामुळे भयभीत आहे. स्वतःचे नातेवाईक सुद्धा रुग्णा जवळ जाऊ शकत नाही अशा रुग्णांची सेवा आपला जीव धोक्यात घालून ह्या परिचारिका रात्रंदिवस करीत आहे. आपले कुटुंबीय, तान्हुल्या सोनु-ल्या बाळाला,

आप्तेष्टनातेवाईक, वृद्ध आई-वडील यांना सोडून, आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवून अशा बिकट आरोग्य संकटामध्ये धैर्यानं, चिकाटीने त्या काम करीत आहेत. यावरून आरोग्य विषयक आव्हानांच्या विस्तृत श्रेणीचे निराकरण करण्यासाठी परिचारिका कशी महत्त्वाची आहे हे दिसून येते. परिचारिका जागतिक स्तरावर लोकांच्या आरोग्यासाठी अमूल्य योगदान देत आहेत. नर्स हीजन्मापासून मृत्यूपर्यंत लोकां सोबत काम करत असते. लोकांच्या आरोग्य समस्ये बाबत ती लोकांच्या अधिक जवळ असते व जागरूक असते. covid-19 या जागतिक साथी च्या आजारांमुळे नर्सिंग चे अतुलनीय कार्य सर्व जगाला पाहायला मिळत आहे. असा हा सन्माननीय व्यवसाय ( profession ) करणारी आजची परिचारिका ही स्वतः आपत्कालीन समयी स्वतःचा निर्णय घेऊ शकते एवढी सक्षम झालेली आहे.

covid-19 वरून आज आपल्या निदर्शनास आलेले आहे की हे एक प्रकारचे विषाणू विरुध्द युद्ध आहे. आज नर्सिंग क्षेत्रात काम करणाऱ्या नर्सिंग स्टाफ ची अतिरिक्त आवश्यकता भासत आहे.

महाराष्ट्र परिचर्या परिषद व इंडियन नर्सिंग कौन्सिल यांच्या नियमावली प्रमाणे अधिक नर्सेसची गरज आहे. म्हणून नर्सेसची संख्या वाढवली पाहिजे व रिक्त पदे त्वरित भरली पाहिजे.

परिचारिकांना वेगवेगळ्या साथी च्या आजाराच्या रुग्णांची शुश्रूषा करावी लागते त्यामुळे तिच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो म्हणून तिला विमा संरक्षण देऊन तिचे व कुटुंबाचे भविष्य सुरक्षित व्हावे.

परिचारिकांसाठी कार्यक्षेत्राजवळ पुरेशा प्रमाणात निवासस्थाने उपलब्ध असावीत जेणेकरून तीला तात्काळ रुग्ण सेवा देण्यास सुलभ होईल.

परिचारिका वेगवेगळ्या शिफ्ट मध्ये काम करतात त्या आपल्या कुटुंबाला मुलांना पुरेसा वेळ देऊ शकत नाही. त्यांच्या मुलांसाठी पाळणाघर, स्वतंत्र शाळा, उच्च शिक्षणासाठी विशेष सवलत, प्रवेश इत्यादींचा समावेश असावा.

परिचारिका सुदृढ असतील तरच त्या उत्तम प्रकारे आरोग्य सेवा देऊ शकतील म्हणून कामाच्या ठिकाणी कॅन्टीन सुविधा, सुरक्षितता, स्वास्थ्यासाठी पोषक वातावरण, ठराविक वेळानंतर थोडीशी विश्रांती याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. ग्रामीण दुर्गम भागामध्ये सेवा देणाऱ्या परिचारिकांना वाहन व्यवस्था व सुलभ प्रवास उपलब्ध व्हावा.

परिचारिकांचे मनोबल वाढवण्यासाठी त्यांना समुपदेशन व प्रोत्साहनपर कार्यक्रम मधून मधून आयोजित करण्यात यावे. तसेच परिचारिकांच्या उच्च शिक्षणाला प्राधान्य देण्यात यावे.

आरोग्य यंत्रणा मजबूत करण्यासाठी परिचर्या क्षेत्राची विशेष काळजी घेणे गरजेचे आहे.

12 मे हा परिचारिका दिवस उत्साहात विविध कला गुणांनी सर्वांनी एकत्र येऊन दरवर्षी साजरा केला जातो. पण ह्यावर्षी covid-19 या जागतिक समस्ये मुळे एकत्र येऊन उत्सव समारंभ साजरे करू शकत नाही. समारंभाच्या आनंदापेक्षा आजच्या क्षणी रुग्णांना उत्तम प्रकारे सेवा देऊन त्यांचे प्राण वाचविण्याने जे समाधान मिळणार आहे ते अमुल्य असणार आहे. परिचर्या सेवा देण्यासाठी आपण त्यांचे मनोबल वाढवू या व आभार मानू या.

परिचर्या सेवा ही काळाची गरज आहे. या सेवेला आणि याचा पाया घालणाऱ्या फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांना कोटी कोटी प्रणाम !

++++++++++++++++++++++++++++++++++++++++

# -: परिचय : -



## सौ. सरला राजेंद्र भावसार

**सेवानिवृत्त अधिसेविका,**

**सार्वजनिक आरोग्य सेवा,**

**महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य.**

**"राष्ट्रीय फ्लॉरेन्स नाइटिंगेल" पुरस्काराने सन्मानित**

**फोन क्रं.**- ९०२८०१५२३७

**ई-मेल** - sarala.bhavsar@gmail.com

**शिक्षण** - बी.एस.सी. नर्सिंग, जे. जे. हॉस्पिटल, मुंबई, सन १९८३

### कार्यसेवा व प्राप्त सन्मान -

**१)** आंतरराष्ट्रीय महिला दिन ८ मार्च १९९७ राज्यस्तरीय आरोग्य सेवा महिला परीषद भा. डॉ. दौलतरावजी आहेर आरोग्य मंत्री यांचे कडून सन्मानपत्र.

**२)** १९९६-९७ व ९७-९८ या कालावीत उत्कृष्ट कामाबद्दल मा. जिल्हा शल्यचिकीत्सक यांचेकडून प्रशस्तीपत्र.

**३)** जळगांव पॅटर्न राबविण्यात सहभाग याविषयी मा. जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कडून अभिनंदनपत्र,

**४)** राज्यस्तरीय परिचारिका गणवेश परिवर्तन समितीमध्ये निवड १९९८.

**५)** उत्कृष्ट कामाबद्दल मा. उपसंचालक आरोग्यसेवा नासिक मंडळ नासिक यांचे कडून दि. १/१०/१९९७ पासुन आगाउ वेतनवाढ मंजूर करण्यात आली,

**६)** वैद्यकीयसेवा व आरोग्यशिक्षण या क्षेत्रात विषेश कार्य केल्या बद्दल राष्ट्रीय विज्ञानमंच यांचेकडून सन्मानपत्र,

**७)** दि. ५/५/९७ रोजी झालेल्या अपघातात उत्कृष्टपणे कार्य केल्याबद्दल मा. जिल्हा शल्यचिकीत्सक यांचे कडून अभिनंदन पत्र.

**८)** मोती बिंदू शस्त्रक्रिया महाशिबीरात सहभागाबद्दल अभिनंदनपत्र,

**९)** कानाचे शस्त्रक्रिया शिबीरात सहभागाबद्दल रोटरी क्लब जळगांव यांचेतर्फे अभिनंदन व धन्यवाद.

**१०)** पल्स पोलीओ कार्यक्रमात सहभागाबद्दल अभिनंदन पत्र,

**११)** दि. १०/७/९६ रोजी भावसार क्षत्रिय समाज महिला मंडळामध्ये रक्तदान शिबीर आयोजीत केले व स्वत: रक्तदान केले याबद्दल जिल्हा शल्यचिकीत्सक सार्वजनिक रुग्णालय जळगांव यांचेकडून प्रशस्ती पत्र.

**१२)** ब्रिजलाल भाउ चॅरेटेबल ट्रस्ट व दै. जनशक्ती तर्फे सार्वजनिक रुग्णालय जळगांव येथे पोलीओ शस्त्रक्रिया शिबीरात उत्कृष्ट कार्याबद्दल प्रशस्तीपत्रक,

**१३)** महाराष्ट्र व्यसनमुक्ती परिषद यांचेकडून व्यसनमुक्ती रॅली व व्यसनमुक्ती कार्यक्रमात सहभागाबद्दल सन्मान पत्र.

**१४)** आरोग्याविषयी आकाशवाणी कार्यक्रमात सहभाग.

## सन १९९४-९८-९९ या कालावधीत उत्कृष्ट कामाचा तपशिल खालील प्रमाणे-

| | |
|---|---|
| **सन १९९४** | - प्लेगच्या साथीत उत्कृष्ट रुग्णसेवा, |
| **सन १९९५-९६** | - लांडगे चावलेल्या रुग्णांना उत्कृष्ट सेवा. |
| **सन १९९६ ते ९९** | - पल्स पोलीओ कार्यक्रमात सहभाग. |
| **सन १९९७** | - जून १९९७ - स्किट रिपेअर कॅम्प (तिरळेपणा शस्त्रक्रिया शिबीर). |
| **सन १९९७** | - ऑगस्ट ते डिसेंबर ९६७ स्वातंत्र्य सैन्नीकांसाठी आरोग्य तपासणी शिबीर, |
| **सन १९९७** | - नोव्हेंबर १९९७ प्लॅस्टीक सर्जरी कॅम्प (त्या रोपण शिबीर). |
| **सन १९९७** | - नोव्हेंबर १९९७ चष्मामुक्ती शिबीर |
| **सन १९९७** | - डिसेंबर १९९७ कानाचे शस्त्रक्रिया शिबीर |
| **सन १९९८** | - जानेवारी १९९८ पोलीओ शस्त्रक्रिया शिबीर |

**सन १९९८** - फेब्रुवारी १९९८ गॅस्ट्रोस्कोपी कॅम्प

**सन १९९८** - जून १९९८ ग्रामीण रुग्णालय रावेर येथे गॅस्ट्रोची साथ आलेली असतांना उत्कृष्ट रुग्णसेवा देण्यात सहभाग.

**सन १९९८** - ऑक्टोंबर १९९८ शालेय आरोग्य तपासणी व विविध शिबीरात सहभाग.

**सन १९९८** - दि. ३ डिसेंबर १९९८ हावडा कुर्ला रेल्वे ला शिरसोली जवळ झालेल्या अपघातात रुग्णांना आपत्कालीन उत्कृष्ट सेवा देण्यात सहभाग,

**सन १९९८** - दि. १ ते ७ डिसेंबर राष्ट्रीय एड्स कार्यक्रमात सक्रिय सहभाग व लुंकड कन्या शाळा जळगांव येथे प्रबोधन क्लास व प्रगती महिला मंडळ जळगांव येथे माता मेळावा घेतला.

**सन १९९८** - वैद्यकीय व्यवस्थापन, शुश्रुषा व रुग्णसेवा जळगांव पॅटर्न राबविण्यात सहभाग

सामान्य रुग्णालय बीड, जळगांव, अहमदनगर, भंडारा, चंद्रपूर, क्षय रुग्णालय बुलढाणा, मनोरुग्णालय येरवाडा पुणे अशा विविध ठिकाणी स्टाफ नर्स, नर्सिंग टयूटर, मेट्रन या पदांवर कार्य, आरोग्य भवन मुंबई येथे असिस्टंट डेप्युटी डायरेक्टर नर्सिंग पदावर प्रभारी प्रशासकीय कामकाज, संपूर्ण सेवा कालावधी ३७ वर्ष.

**Dr Sujata Chavan,**



Assistant Professor.

BSc. MA,MSW. PGDip(Human Rights) PhD(LAW), India

(t) +91 98679 34108

(e) drsujatachavan61@gmail.com

sujata.chavan@tiss.edu

Professional Experience

---

Tata Institute of Social Sciences, Mumbai

Asst. Professor.(November 2013-Present)

Family Court, Mumbai

Marriage Counsellor (October 1989-November 2013) (24 Years)

Tata Memorial Hospital, Mumbai

Head of Social Work Department (November 1986 - September 1989)

GT Hospital, Mumbai

Medical Social Worker (January 1984 - November 1986)

Plastic Surgery Dept., KEM Hospital, Mumbai

Speech Therapist (June 1983 - January 1984)

Paediatrics Dept., KEM Hospital, Mumbai

Medical Social Worker.(May 1983 - January 1984)

Publications

---

Speech Therapy for Cleft Lip and/or Cleft Palate (1986, Republished 1998).
[ Marathi, English, Hindi, Gujarathi]

Role of Medical Social Worker in a Hospital Setup (1986) [English]

Therapies for Cancer Patients (1988) [English]

Family Court - Act and Procedure (1993, Republished 2016, Echasty Publication) [Marathi]

Role of Marriage Counsellor in a Judicial Setup (1993) .[English]

Saptapadi : Pre Marriage Counselling (2011). [Marathi]

Dos and Don’ts for Parents with Matrimonial Disputes (2013). [English]

Notes on Hindu law for LLM Students (1996) .[English]

“Vihahawed” : Marriage Counselling (2000, Granthali Publication). [Marathi]

“Khau Aanande” (2016, e-sahity) [Marathi] “Family court” (2017, e-sahity). [Marathi]

“Custody of Children in Matrimonial Disputes” (2017, Studium Press) .[English]

“Trainer’s manual on communication skills” (2018, Studium Press). [English]

“Sankalan Anubhavache” (2018, e-sahity) .[Marathi]

Will-“ मृत्युपत्र”, esahitya 2019 .[Marathi]

“Hirkani “, esahitya -2019 .[Marathi]

उत्कृष्ठ कार्याबद्दल दि. १२ मे २००८ रोजी महामहीम मा. सौ. प्रतिभाताई

पाटील माजी राष्ट्रपती यांच्या हस्ते राष्ट्रपती भवन दिल्ली येथे

"राष्ट्रीय फ्लॉरेन्स नाइटिंगेल" पुरस्काराने सन्मानित.



प्रिय वाचक

कसं वाटलं पुस्तक? आवडलं? नाही आवडलं? जे काही वाटलं ते कळवा. आम्हाला कळवा. लेखक लेखिकांना कळवा. त्यांना लिहायला हुरूप येईल. तुम्हाला वाचायला मिळत राहील. तुमचं ज्ञान वाढेल.

पण एकटे एकटे मजा नका घेऊ. हे पुस्तक आणि ई साहित्यबद्दल इतरांना सांगा. खूप लोकांना यात सामिल होऊ द्या.
आणि हो. तुम्ही स्वतःही लेखक बना. का? त्यात काय कठीण आहे? तुम्ही तुमच्या व्यवसायाबद्दल लिहा. तुमच्या गावाबद्दल लिहा. तुमच्या माणसांबद्दल लिहा. तुमच्या आयुष्यातले अनुभव लिहा. तुमच्या प्रवासाचे वर्णन लिहा. काय आणि किती लिहीता येईल याला सीमा नाही. ते प्रसिद्ध करण्याची जबाबदारी आमची. ते प्रसिद्ध करण्यापुर्वी आम्ही त्यावर संपादकीय संस्कार करतो. त्यात काही चुका, शुद्धलेखन हे सर्व तपासून एक सुंदर पुस्तक वाचकांसाठी सादर करतो. आमची भली मोठी अनुभवी टीम तुमचे पुस्तक अगदी मस्त सजवून देते. आणि हे सर्व… अगदी विनामूल्य. एकही पैसा खर्च न करता.
आता लिहा बरं. व्हा लेखक लेखिका.

बाकी सर्व आमच्यावर सोडा.

टीम ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com